**Deputy Superintendent of Police, ACB, Nandurbar**

पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार

१२, जयचंद नगर, कोरीट रोड, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार–४२५४१२

☎ (०२५६४) २३०००९

✉dyspacbnandurbar@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक २९/०६/२०२४

## -: प्रेसनोट :-

**आलोसे यांनी २५,०००/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २०,०००/- रूपये लाचेची मागणी केलीबाबत...**

| | |
|---|---|
| **घटक** | नंदुरबार |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | नवापुर पोलीस स्टेशन गु. रजि. नं. ३९३/२०२४ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे. |
| **आरोपीचे नाव व कार्यालय** | सागर अशोक अहिरे, वय -३३ वर्षे, व्यवसाय-नोकरी, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधीकारी कार्यालय, नवापुर, ता.नवापुर, जि.नंदुरबार रा.प्लॉट नं. १० रुपाईनगर, पेरेजपुर रोड, साक्री, ता.साक्री जि.धुळे |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | २५,०००/- रुपये (वीस हजार रुपये) |
| **तडजोडीअंती मागणी केलेली लाचेची रक्कम** | २०,०००/- रुपये (वीस हजार रुपये) |
| **थोडक्यात माहिती** | यातील मुळ तक्रारदार श्री. ईसाक जॉन गावीत यांची पत्नी हेमाबाई गावीत यांचे नावावर थुवा ता. नवापुर येथे शेत सर्व्हे नं. १८/१, ७५/१/ब, ९५/१/अ अशी सुमारे पाच एकर शेतजमीन आहे. सदर शेती हि कोरडवाहु असल्याने सदर शेतात मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजने अंतर्गत वैयक्तीक शेततळे मंजूर करणेसाठी कृषी विभाग नवापुर येथे ऑनलाईन अर्ज केला होता. त्यानंतर ऑगस्ट-२०२३ मध्ये तक्रारदार यांचे पत्नीचे नावावर असलेल्या शेत सर्व्हे नं. ९५/१/अ या क्षेत्रात शेततळे बांधण्याची मंजुरी मिळाली आहे.<br>त्यानंतर दिनांक १३/०२/२०२४ रोजी तालुका कृषी विभाग, नवापुर येथील मंडळ कृषी अधिकारी सागर अहिरे हे तक्रारदार यांना आमपाडा फाटयाजवळ भेटले, असता त्यांनी तक्रारदार यांचेकडुन त्यांचे शेतात शेततळयाचे बांधकामाचे मोजमाप करण्यासाठी तसेच सदरचे अनुदान मिळवुन देण्यासाठी २५,०००/- रूपयांची मागणी केली होती. त्यानंतर तक्रारदार यांनी दिनांक २०/०२/२०२४ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयाचे पोहवा/विलास पाटील यांचेशी संपर्क करून त्यांचे तक्रारीबाबत सविस्तर माहिती दिलेली होती, त्यांनतर तक्रारदार यांचे विनंतीवरुन अॅन्टी करप्शनचे पथक नवापुर येथे आल्यानंतर तक्रारदार यांनी दोन पंचासमक्ष तक्रार दिली होती.<br>दि.२०/०२/२०२४ रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून पंच साक्षीदारांसमक्ष लोकसेवक मंडळ कृषी अधिकारी सागर अहिरे यांची लाच मागणी पडताळणी केली असता नमुद लोकसेवक मंडळ कृषी अधिकारी सागर अहिरे यांनी तक्रारदार यांचेकडून त्यांचे शेतातील शेततळयाचे अनुदान मिळवून देण्यासाठी २५,०००/- रू. लाचेची मागणी करून तडजोडअंती २०,०००/- रू. लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांचेविरुध्द नवापुर पोलीस स्टेशन गु.र.नं. ३९३/२०२४, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

| | |
|---|---|
| **कामगिरी पथक** | सदर कामगिरी मा.पोलीस अधीक्षक सो, श्रीमती. शर्मिष्ठा घारगे-वालावलकर, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक, मा.अप्पर पोलीस अधिक्षक सो., श्री.माधव रेड्डी, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक, पोलीस उपअधीक्षक, श्री.नरेंद्र पवार (वाचक) ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस उपअधीक्षक, श्री.राकेश चौधरी ला.प्र.वि., नंदुरबार यांचे पर्यवेक्षणाखाली पोलीस निरीक्षक, श्री. समाधान वाघ, अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार, पोहवा/विजय ठाकरे, पोहवा/विलास पाटील, पोना/देवराम गावीत, पोना/हेंमतकुमार महाले, पोना/सुभाष पावरा अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार पथकाने केली आहे. |
| **सापळा अधिकारी** | श्री. समाधान एम.वाघ, पोलीस निरीक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार. |
| **तपास अधिकारी** | श्री. राकेश आनंदराव चौधरी, पोलीस उप अधीक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबाबत तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार कार्यालयास संपर्क करावा.

संपर्क पत्ता: ला.प्र.वि., नंदुरबार कार्यालय
संकेतस्थळ : dyspacbnandurbar@gmail.com
ई–मेल: dyspacbnandurbar@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/अॅप्लीकेशन : acbnandurbar@gmail.com
टोल फ्री क्रमांक : १०६४
दुरध्वनी क्रमांक : ०२५६४– २३०००९,२३१००९

(राकेश आनंदराव चौधरी)
पोलीस उप अधीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार